ललिता गंडभीर
4200 North Ocean Dr.
#1501 - 2
Riviera Beach, FL 33404
USA
lalitagandbhir@hotmail.com

# अनुभूती

आमच्या एकत्र कुटुंबात देवावर पूर्ण विश्वास असणाऱ्यांपासून 'देवबिव हे सगळं मनुष्यनिर्मित थोतांड आहे' असं म्हणणारी माणसं होती. आजोबा रोज यथासांग देवपूजा भक्तिभावाने करत. वडील, देवपूजा करण्याची त्यांच्यावर पाळी आली तर कोट—टोपी घालून 'मला कामं आहेत, भटजी बोलवा' म्हणून बेपत्ता होत. घरांतल्या स्त्रिया रोज देवाला हात जोडत. उपासतापास करत नसत. आजी मला पकडून बरोबर देवळात न्यायची. दरवाज्याजवळच्या कासवापासून नंदी इ. दिसेल त्याला नमस्कार करत ती आणि मी गाभाऱ्यापर्यंत पोचत असू. माझी एक आत्या सिद्धारूढ स्वामींची पूजा करत असे. नंतर साईबाबा आमच्या घरांत अवतरले. त्यांचेही भक्त आहेत.

ह्या वातावरणांत माझ्या मनांत 'देव आहे का नाही' ह्याविषयी संभ्रम निर्माण झाला. तो आजतागायत आहे. वडिलांचं म्हणणं पटतं; पण आजोबांनी, आजीने केलेले संस्कार पुसले जात नाहीत. एकूण माझा कल 'देव नाही' ह्या म्हणण्याकडे झुकतो.

तरी पण कांहीं ठिकाणी गेल्यावर मला ज्याला 'स्पिरिच्युअल', 'दिव्य' म्हणता येईल अशी अनुभुती येते. डोळ्यासमोर जे दिसतं त्यांत विलीन होऊन जावंसं वाटतं. 'ह्या दृश्याचा, अस्तित्वाचा आपणही एक भाग आहोत' असं जाणवतं. ती ही ठिकाणं.

मी पंधरा वर्षांची असतांना आजीबरोबर नाशिकला कुंभमेळ्याला गेले होते. प्रत्यक्ष देवळं वगैरे मला नीट आठवत नाहीत. पण नदीकाठची रात्र तेव्हढी आठवते. नदीच्या दोन्ही बाजूला दगडी प्रशस्त घाट बांधलेले होते. दोन्ही किनाऱ्यांवर

देवळांच्या रांगा होत्या. रात्री आम्ही तिथे पोचलो तेव्हा देवळांत पूजा, आरत्या व मंत्रपठण चाललं होतं. वातावरणांत फुलांचा, कापराचा मंद वास दरवळत होता. तसंच आरत्यांचे, मंत्रपठणाचे व घंटांचे संगीतमय सूर निनादत होते. स्त्रीपुरुष छोट्या दिवल्या पेटवून नदींत सोडत होते. अशा अनेक दिवल्या आम्ही उभे होतो तिथे वाहत येत होत्या. परिणामी दिवल्या बराच वेळ तरंगत राहत होत्या. हळूहळू भक्तगणांची व दिवल्यांची संख्या वाढत गेली. नदीचं पूर्ण पात्र दिवल्यांनी भरलं व दिवल्यांच्या मंद जादूई प्रकाशाने आसमंत उजळून गेलं. आरतीचा घोष, कापूर व फुलांचे सुवास, नदीवरचा तरंगता प्रकाश, घंटांचे निनाद ह्या मिश्रणाने वातावरणांत आगळाच रंग भरला होता.

त्या नदीकिनाऱ्यावर मी स्वतःला विसरले. वेळ—काळ विसरले आणि वातावरणांत मिसळून गेले.

हा आयुष्यात आलेला पहिला स्पिरिच्युअल अनुभव.

न्यू हॅम्शरला (New Hampshire) 'लून माउंटन' (Loon Mountain) म्हणून एक मोठ्ठा डोंगर आहे. एका उन्हाळ्यांत आम्ही तो बघायला गेलो होतो. स्की लिफ्टने त्या डोंगरावर गेलो. वर मोकळी जागा होती आणि भोवती हिरवीगर्द झाडी. त्या झाडींतून एक लहानशी पायवाट जाताना दिसत होती. त्या पायवाटेने गर्द झाडीतून मी ती वाट कुठे जाते ते बघण्यासाठी गेले व अकस्मात एका तळ्याच्या काठी पोचले. त्या हिरव्या दाट झाडीत ते लहानसं तळं स्फटिकासारखं चमचमत होतं. त्यांतलं पाणी अगदी स्थिर होतं. त्या तळ्यांत काठालगतच्या झाडीचं व पश्चिमेला मावळणाऱ्या सूर्याच्या गुलाबी छटांनी रंगलेल्या निळ्या आकाशाचं प्रतिबिंब पडलेलं होतं. तळ्याचा किनारा निर्मनुष्य होता. डोंगरमाथ्यावर ते तळं अनपेक्षित होतं. ते पाहून मी स्तब्ध झाले. भासाच्या संस्कृत वाङमयांतील हिमालयाच्या निसर्गसौंदर्याच्या वर्णनाची मला आठवण झाली. 'पलीकडच्या किनाऱ्यावर शंकर व्याघ्रासनावर बसला आहे. त्याच्यासमोर पार्वती भिल्लिणीच्या वेशांत उभी आहे' असं दृश्य मला माझ्या डोळ्यासमोर माझ्या नकळत उभं राहिलं. मी स्वतःला, आणि वेळ—काळ वगैरे साऱ्याला विसरून गेले; त्या दृश्याचाच भाग झाले. किती वेळ मी तिथे उभी होते मला माहीत नाही. त्या तळ्याकाठी मला तो चिरंतनत्वाचा, दिव्यतेचा अनुभव आला.

अलास्कांत तालकीटना (Talkeetna) ह्या लहानशा खेड्यांतून हिमालयासारख्या, बर्फाच्छादित मकिन्ले (McKinley) पर्वतांच्या राशी दिसतात. त्यांच्यांत दनाली (Denali) हे सर्वांत उंच शिखर आहे. तिथे डिसेंबरमधे सूर्य अगदी थोड्या वेळासाठी उगवतो व मावळतो. या पर्वतराशी त्या सूर्यप्रकाशांत सुंदर दिसतात, म्हणून आम्ही एका डिसेंबरमधे या डोंगरराशी बघायला तालकीटनाला गेलो. तालकीटनाला आम्ही उतरलो होतो त्या लॉजच्या हॉलमधल्या तीन मजली उंच खिडक्यांसमोर उजाडण्याच्या वेळी (सकाळी १०:३०) येऊन बसलो. त्या खिडक्या पर्वतराशी बघण्यासाठी म्हणून लावल्यात.

आम्ही तिथे पोचलो तेव्हा आकाशात असंख्य चांदण्या चमकत होत्या. हिमवर्षाव, धुकं, ढग, किंवा तत्सम काही नव्हतं हे पाहून आनंद झाला. त्या पर्वतराशी पुष्कळदा धुक्यांत लपलेल्या असतात. 'आपण भाग्यवान आहोत' असा विचार करत मी त्या ताऱ्यांकडे बघत होते, तोच आकाश फटफटायला लागलं. चांदण्या फिकट होऊ लागल्या. डोंगरराशी दिसू लागल्या. दिशा उजळल्या. थोडासाच वेळ गेला आणि सर्वात उंच दनाली ह्या पर्वताच्या शिखरांवरती गुलाबी रेषा उमटली. एखाद्या चित्रकाराने कुंचला घेऊन गुलाबी रेषा काढावी, तशी ती गुलाबी रेषा उगवत्या सूर्यप्रकाशात सर्व पर्वतराशींवर उमटत गेली. हळूहळू गुलाबी रंग गर्द होत गेला व शिखरावरून लालगुलाबी पाणी डोंगरराशींवर ओतलं जावं तसा पर्वतराशींवर पसरू लागला. पर्वतराशींवर पसरत जाणाऱ्या अशा सूर्योदयाच्या लालिम्याला 'आल्पाईन ग्लो' (Alpine glow) म्हणतात.

ते दृश्य पाहून लॉजमधले सगळे स्त्रीपुरुष भारून गेले. हॉलमधे शांतता पसरली. मी दुसऱ्याच जगांत पोचले. 'त्या पर्वतराशींमागून एक रथ येतो आहे, त्याला सोनेरी किनारीची झूल पाठीवर घातलेले पांढरे घोडे जोडले आहेत, रथांत मुकुट घातलेला राजबिंडा सूर्यदेव उभा आहे. त्याच्या मुकुटधारी मस्तकामागे आपल्या किरणांच्या प्रभेने पर्वतराशींना रंगवणारा सूर्य तळपतो आहे' असं दृश्य माझ्या डोळ्यासमोर उभं राहिलं. आणि खरंच आपल्या किरणांनी पर्वतराशी रंगवणारा सूर्याचा लाल गोळा त्या शिखरामागून उगवला.

मी भानावर आले तेव्हा चांदण्या मावळल्या होत्या. आकाश निरभ्र, निळं होतं.

आम्ही ब्रझिलमधे रिओ द जानिरोला गेलो होतो तेव्हाची ही कथा.

रिओ हे माझ्या मते जगातलं सर्वांत सुंदर शहर आहे. त्या शहराबाहेर एक बगीचा आहे. बगीचा नावालाच. ते रेन फॉरेस्ट आहे. ज्या प्रवाशांना ब्रझिलच्या प्रचंड रेन फॉरेस्टमधे जाण्यासाठी वेळ नसतो, त्यांना रेनफॉरेस्टची एक झलक दाखवण्यासाठी ह्या प्रचंड बगीचाचा खेळ मांडला आहे. खऱ्या रेन फॉरेस्टमधे पायवाटा नसतात, पण या रेनफारेस्टमधे प्रवाशांसाठी पायवाटा बांधल्या आहेत.

त्या बगीच्यांत आम्ही हिंडत होतो. प्रचंड वृक्ष, त्यावरच्या वेली, असंख्य पक्षी, छोटी माकडं सगळं काही जादूमय जगतासारखं होतं. हिंडताना मधेच आम्ही एका छोट्या मैदानांत आलो. तिथे एक मोठ्ठा गोलाकार, उथळ, दगडी हौद बांधला होता. त्यांत रंगीबेरंगी मासे तरंगत होते. पण मला मोहांत पाडलं ते कमळांच्या पानांनी. त्या हौदांत सगळीकडे कमळांची पानं व रंगीबेरंगी कमळं पसरलेली होती. ती हिरवी पानं जाड होती. त्यांना कडा होत्या. परिणामी ती पानं एखाद्या थाळीसारखी दिसत होती. तो हौद अगदी संथ होता. त्यामुळे त्या जाड पानांत पडलेले पावसाचे थेंब अगदी स्थिर होते. त्या हिरव्यागार प्रचंड पानांची कांती रेशमी होती. ते थेंब त्या पानांवर हिऱ्यासारखे चमचमत होते.

काही पानं पुष्कळ मोठ्ठी होती. आपल्या पुराणांतल्या कथांत 'नवजात बालकं कमळाच्या पानावर ठेवून नदीत सोडल्याच्या' कथा मी वाचल्या आहेत. तसंच 'ह्या एका पानावर जन्मलेलं मूल ठेवून त्याला पाण्यात सोडणं शक्य आहे' असं मला वाटलं.

मी मासे आणि पानं यांत गुंतले होते. कमळांकडे माझं लक्ष नव्हतं. एका लाल माशाकडे बघत माझी नजर त्या हौदाच्या मध्यापर्यंत पोचली. तिथे एक मोठ्ठं लाल कमळाचं पूर्ण फूल होतं. हौदामधल्या कमळांच्या प्रजेचं ते कमळ राजाधिराज होतं. त्या कमळाभोवती गोलाकारांत मोठी मोठी हिरवी पानं तरंगत होती.

मी टक लावून ते सुंदर कमळ मनःपटलावर कोरून ठेवत होते. तोच सोनेरी किनारीचं लाल वस्त्र धारण केलेली लक्ष्मी त्या कमळावर प्रकट झाली. तिने मुकुट व सोन्याचे अलंकार घातले होते. तिच्या दोन हातांत कमळं होती. ती तळ्यांतल्या कमळावर एक पाय दुमडून व दुसरा पाय पानावर ठेवून आसनस्थ झाली होती.

डोळे विस्फारून मी तिच्याकडे बघत होते. कुणीतरी कांहींतरी म्हटलं आणि लक्ष्मी अंतर्धान पावली.

आम्ही अजंठा–एलोराची लेणी पाहायला गेलो होतो. भारतांतला हिवाळा, तरीपण दुपारी ऊन रणरणत होतं. खोदलेल्या गुहांमधून हिंडून आम्ही भिंतीवरची शिल्पं पाहिली. लेणी पाहायला भारतीय व परदेशी प्रवाशांची खूप गर्दी होती. ह्या सगळ्यांतून निसटून आम्ही बाहेर पडलो. तिथे एका मोठ्ठ्या उंच खडकावर शंकर – पार्वतीची मूर्ती खोदलेली होती.

त्यांच्या विवाहाचं ते दृश्य होतं असं आमचा गाइड म्हणाला. "पार्वती लाजते आहे" असंही तो म्हणाला.

ते खरं आहे का हे बघायला मी पार्वतीकडे टक लावून बघू लागले. अकस्मात तिचे डोळे थोडे हलले, मान कलली, ती माझ्याकडे बघत आहे असं मला वाटलं. मग तिने मंद स्मित केलं.

तेव्हढंच! पार्वती परत दगडाची झाली.

मी क्षणभर थरथरले. उन्हामुळे मला भास होतायत असं मला वाटलं. बाटलीभर पाणी प्यायले आणि परत पार्वतीकडे टक लावून बघत राहिले; पण ती परत जागृत झाली नाही.

गेल्या उन्हाळ्यांत आम्ही तीन महिने अलास्कांत अँकरेज येथे राहिलो होतो. उन्हाळ्यांत तिथे सॅमन मासे येतात. ह्या माश्यांचा जन्म एका लहानशा डबक्यांत होतो. तिथे राहून थोडं मोठं झाल्यावर ते डबक्यांतून झऱ्यांत, झऱ्यांतून नदींत, नदींतून समुद्रांत पोचतात. समुद्रांत वाढ पूर्ण झाली की नर व मादी डबक्याच्या दिशेने उलट प्रवास करतात. त्यांना त्या डबक्यांतल्या पाण्याचा वास त्यांच्या तीव्र संवेदनशक्तीमुळे येतो. ते महाप्रयत्नाने प्रवाहाच्या उलट, दगडधोंड्यांवरून उड्या मारत आपल्या जन्मस्थळी येतात. मादी तिथे अंडी घालते व मरते. नर आपले पुंबीज त्या

अंड्यांवर पसरतो व थोडे दिवस आसपास राहून तोही मरतो. नवजात सॅमनची पिल्लं अक्षरशः आईवडिलांना खाऊन जगतात व हे चक्र परत सुरू होतं, ही अगदी थोडक्यांत 'सॅमन रन्'ची कथा.

अँकरेज शहराबाहेर 'सुवर्ड हायवे' (Seward Highway) लगत पॉटर मार्श (Potter Marsh) नांवाचा एक दलदलीचा प्रदेश आहे. त्यांत उंच गवत, मधूनमधून झुडपं व झरे आहेत. तळाला पाणी आहे. दलदलीच्या प्रदेशालगत सुवर्ड हायवे व त्याच्या पलीकडे समुद्र आहे.

त्या झऱ्यांत सॅमन मासे येतात.

त्या दलदलीच्या भागावर चालता येत नाही, म्हणून बोर्डवॉक्स बांधलेले आहेत. आम्ही अँकरेजमधे असताना रोज बोर्डवॉकवर जाऊन सॅमन रन सुरू झाला की मासे पाहायचे असं मी ठरवलं होतं.

सॅमन रन सुरू झाल्याच्या बातम्या येत होत्या. आम्ही सॅमनची प्रतिक्षा करत होतो.

एक दिवस बोर्डवॉकवरून छोट्या डबक्यात दोन दोन फूट सॅमन मासे दिसले. एक काळा, एक लाल. काळा मासा झऱ्यांतून डबक्याकडे जाण्याचा प्रयत्न करत होता. लाल मासा डबक्यांत होता. तो बहुतेक काळ्याची वाट बघत होता. काळा एका धोंड्यासमोर अडला होता.

एकदम त्या काळ्याने धोंड्यावरून उडी मारली. काही क्षण तो शेपटीवर उभा होता. पाण्याने व सूर्यप्रकाशात तो चमचमला. मी एकाग्रतेने त्याच्याकडे पाहात होते. तो उभ्या अवस्थेंत क्षणभर असेल, नसेल. तेव्हढ्या क्षणार्धांत तो मत्स्यावतारी विष्णू झाला. त्याचं अर्ध शरीर सॅमनचं होतं. त्यांतून विष्णूची छोटी मूर्ती प्रकट झाली.

हा आभास मला दिसला न दिसला. विष्णू निळा होता. त्याच्या अंगावर दागिने व मुकुट होता.

दुसऱ्या क्षणी तो काळा धोंड्यापलीकडे पोचला होता.

ह्या अनुभूती मला परमप्रिय आहेत. लून माउंटन माझ्या कक्षेंतला. तो पाहायला मी परत परत तिथे गेले. पण मला शंकर–पार्वतींनी दर्शन दिलं नाही.

हे क्षणिक दृष्टान्त (fleeting glimpses) कधी व केव्हा दिसतील, हे मला सांगता येत नाही. ते येतात तेव्हा मी प्रकट झालेल्या देवदेवतांचा विचारही करत नसते हे खरं.

आजी लहानपणी मला पकडून पुराणांतल्या कथा सांगत असे. तेव्हा मी मनात त्या कथांची चित्रं रंगवत असे. मनात खोल कुठेतरी लपलेल्या स्मृती अशा उफाळून येत असतील!

मला न सुटलेलं हे कोडं आहे.

मी सतत पुढच्या तशा दृष्टांतांची वाट बघते, हे मात्र खरं.

पूर्वप्रसिद्धी 'एकता'